# प्रकरण दुसरे

## केशवसुतांचे काव्य

2·1 (अ) आधुनिक कवितेची पहाट -

आधुनिक मराठी काव्याचे जनक म्हटल्याबरोबर डोळ्यासमोर उभे रहातात ते केशवसुत आधुनिक मराठी काव्याच्या क्षेत्रात केशवसुतांचा मान मोठा आहे. केशवसुतांच्या काव्याचा विचार केल्याशिवाय आपणाला आधुनिक मराठी काव्याचा विचार करताच येणार नाही म्हणून आधुनिक काव्याचा विचार करताना केशवसुतांची कविता ही मुलाधार मानावी लागते. कवी "बी" हे आधुनिक कवितेची पुरस्कर्ते होते. म्हणून त्यांच्या काव्याचा विचार करण्यापर्वी आधुनिक कवितेचा पाया ज्यांनी घातला त्या केशवसुतांच्या काव्याचा विचार करावा लागतो. आधुनिक मराठी काव्याचा विचार करण्यापूर्वी प्राचीन मराठी काव्य कशा स्वरूपाचे होते याचा आपण धावता आढावा पाहू.

साहित्यनिर्मितीच्या आरंभापासून जर आपण विचार केला तर आपणास असे आढळून येते की, प्राचीन कवितेची परंपरा शाहिरांपर्यंत म्हणाजे जवळ जवळ १८ व्या शतकाच्या अखेरपर्यंत चालू होती. इ.स.१८०० पर्यंत मराठी वाङ्मय हे तीन परंपरातून मोठया दिमाखाने वैभवाने नांदत होते. या परंपरा म्हणाजे संत कवींची परंपरा, पंडिती कवींची परंपरा आणि शाहिरी काव्याची परंपरा. या तीनही परंपरा मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात वैभवाने डोलत होत्या, फुलत होत्या.

संत परंपरेने आपल्या साहित्यातून अध्यात्म विषय मांडला. परमेश्वराची भक्ती आणि अध्यात्मप्राप्ती हेच त्यांनी आपल्या साहित्यातून मांडले. ज्ञानेश्वर, तुकारामापासून चालत आलेल्या या संत परंपरेने अधिक प्रमाणात काव्यच निर्माण केले. म्हणाजेच संतांनी मोक्ष हे

ध्येय आणि भक्ती हे साधन आपल्या डोळ्यासमोर ठेवले. भक्तीच्या माध्यमातून लोकांचा उध्दार व्हावा, त्यांची सेवा आपल्या हातून घडावी, अशी तळमळ त्यांनी आपल्या काव्यातून व्यक्त केली. मराठी भाषेला त्यांनी वैभवाच्या शिखरावर पोहचवले पण भक्तीच्याच मार्गाने म्हणजेच मराठी साहित्यात संत परंपरेने अध्यात्म हाच विषय पुरेपूर भरलेला दिसतो.

पंडिती काव्याची परंपरा मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथपंडित, मोरोपंत इत्यादी पासून सुरु झालेली दिसते. पंडित कवींनी बहुतांश करुन आख्यान काव्येच लिहलेली दिसतात. त्याचबरोबर कथाकाव्येही निर्माण केली. मुक्तेश्वराने महाभारताचा पसारा मांडला तर मोरोपंतानी रामायण वेगळ्या रुपातून व माध्यमातून काव्यबध्द केले. भक्ती, रसाळपणा आणि ओघवती भाषा ही त्यांच्या काव्याची प्रमुख वैशिष्टये दिसून येतात.

तिसरी परंपरा म्हणजे शाहिरांची त्यांच्या काव्यात शृंगार आणि वीर हे दोन प्रमुख रस आढळतात. रामजोशी, सगनभाऊ, परशाराम प्रभाकर, होनाजी बाळा आणि अनंतफंदी ही प्रमुख नावे आपणा सर्वांच्याच परिचयाची आहेत. उत्कटता आणि आवेश ही वैशिष्ट्ये त्यांच्या काव्यातून दिसून येतात. पेशवाईचा अस्त आणि इंग्रजांचा उदय शाहिरांनी उघडया डोळ्यांनी पाहिला. या घटनेने अवघा देश तळापासून ढवळला.

इ.स. १८१८ मधे स्वातंत्र्याचे उदक दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांच्या हाती सोडले आणि येथून पुढे सबंध भारतावर इंग्रजांचा अंमल सुरु झाला. या राजकीय घटनेमुळे सांस्कृतिक आणि वाड्.मयीन परिणामही घडलेले दिसू लागले. एका नव्या युगाला प्रारंभ झाला की काय असे वाटू लागले. या इंग्रज राजकर्त्यांनी स्वत: बरोबर अनेक गोष्टी या देशात आणल्या. अनेक नवनवीन विचार आणले. चातुरवर्णावर आधारलेल्या आपल्या समाजाला या नवीन गोष्टींचे आकर्षण वाटू लागले. या आकर्षणातूनच

अनुकरणाची प्रेरणा दिसू लागली. जवळ जवळ १८५० पर्यंतचा कालखंड शाळांसाठी पाठ्यपुस्तके तयार करण्यात व शालोपयोगी पुस्तकांची भाषांतरे करण्यातच गेला. या कालखंडात संस्कृत काव्य, नाटकादी ग्रंथांची भाषांतरेच विपुल प्रमाणात दिसत होती. जवळ जवळ साहित्याची सर्वच क्षेत्रांत भाषांतराची प्रवृत्ती दिसून येत होती. त्यामुळे या कालखंडातील वाङ्मयाचे परिशीलन करून श्री.दत्तो वामन पोतदार म्हणतात - "नाव घेण्याजोगा एकही ग्रंथ या कालखंडात झाला नाही. सटरफटर पुस्तके पुष्कळ झाली. तारांगण पुष्कळच उगवली पण तमोनाशक चंद्र मात्र कुठेच आढळला नाही." [१] पुढे १८५७ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली आणि इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाला चालना मिळाली.

"१८५७ ते १८८५ या काळात इंग्रजी वाङ्मयाच्या वाचनाने अभ्यासाने आधुनिक मराठी काव्याच्या युगाची पूर्वतयारी होत होती. इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासक्रमात शेक्सपिअर मिल्टन, वर्डस्वर्थ,कोलरिज, शेली, बायरन, कीटस यासारख्या कवींचे काव्य अभ्यासावे लागे. इंग्रजीतील ही कविता दोन प्रकारची होती. तिचा एक प्रकार म्हणजे मिल्टनचे पॅरेडाइज लॉस्ट, किंवा स्कॉटचे "लेडी ऑफ दि लेक" यासारखी प्रदीर्घ काव्ये, तर दुसरा प्रकार म्हणजे वर्डस्वर्थ, कोलरिज, शेली, बायरन यांची स्फुट भावगीतात्मक आत्मप्रकटीकरण करणारी कविता. या कवितांच्या अभ्यासाचे संस्कार कवींच्या व तत्कालीन वाचकांच्या मनावर होत गेले आणि त्यातून एक नव्या प्रकारची अभिरुची तयार झाली. या कालखंडात जुने भक्ती संप्रदायी अभंगपरंपरेचे वळण, मोरोपंती पंडिती परंपरेचे वळण - गिरविणारी कविताही लिहली जात होती. पण त्यापेक्षा हे नव्या पध्दतीचे वळण अधिक दिसू लागले होते. चिंतामणी पेठकरांची "गंगावर्णन" कुंटयांचा "राजा शिवाजी" ही अनुकरणात्मक स्वतंत्र दीर्घ काव्ये हे या कालखंडातील काही ठळक प्रयत्न. स्फुट कवितेच्या प्रांतात विष्णु मोरेश्वर महाजनींनी "कुसुमांजलि" या नावाने रचलेली कविता वळणाने भावगीतांच्या स्वरूपाची होती." [२]

इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांचे राज्य स्थापन होत असताना सामाजिक, वैचारिक क्रांती घडत होती. या इंग्रज राजकर्त्यांनी समाजात अनेक नव्या गोष्टी आणल्या आणि त्याचा परिणाम समाजावर होऊ लागला. समाजात जवळ जवळ सर्वच क्षेत्रात आमूलाग्र बदल होऊ लागला. नवनवीन सुधारणाही होऊ लागल्या होत्या. उदाहरणार्थ - रस्ते, आगगाड्या, पोस्ट या यांत्रिकतेने समाजाचे डोळे दिपून चालले होते. याच बरोबर छापखान्याचेही आगमन झाले आणि त्यातून वर्तमानपत्राचा जन्म झाला. वैचारिक क्षेत्रातही बदल घडू लागला. त्यामुळे लोकांच्या मनावर चांगलाच परिणाम झालेला दिसून येत होता.

चातुरवर्णावर आधारलेल्या आपल्या संस्कृतीची रचना ही विषमतेवर आधारलेली असल्यामुळे सर्व वर्णांना समान वागणूक तर नव्हतीच. सर्व वर्णांना सारखे शिक्षणही नव्हते. परंतु इंग्रज राज्यकर्त्यांनी शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करून समाजातील सर्व जाती-वर्णांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली हीच मोठी क्रांती इंग्रजांनी केली. या गोष्टीचा समाजावर विलक्षण परिणाम होऊ लागला होता. शिक्षणाच्या या प्रसाराने आपल्या देशाच्या पुनरुज्जीवनाला अगदी नवे वळण लागले. या प्रत्येक क्षेत्रातल्या प्रचंड घडामोडीमुळे जीवनाकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोनच पालटला. धार्मिक, सामाजिक वैचारिक, सांस्कृतिक आणि राजकीय या सर्वच क्षेत्रांत आम्ही नव्या क्रांतिकारक विचारसरणीचा स्वीकार केला.

इंग्रजांच्या या बाह्य वैभवाला बरेच लोक भुलून गेले. काही लोक तर इंग्रजांचे स्तुतिपाठक बनले. त्यामुळे त्यांनी आपल्या नोकरपेशाला अनुकूल असा सुधारकांचा पंथ स्वीकारला. या लोकांना या पाश्चिमात्य नवसंस्कृतीचे क्रांतिकारक स्वरूप कळलेले नव्हते. त्यामुळे त्यांनी स्त्रीशिक्षण, बालविवाह, पुनर्विवाह अशासारख्या सुधारणांवरच आपले सामर्थ्य एकवटले. न्या. रानड्यांनी ब्रिटीशांच्या इतिहासातील उदारमतवादाचा स्वीकार केला आणि आपल्या राष्ट्राच्या सांस्कृतिक श्रेष्ठतेचे पुनरुत्थापन करण्याचा प्रयत्न चालविला. जुन्या

परंपरेला तडा न जावू देता नव्याचा सौम्यपणे पुरस्कार करायचा परिपाठ त्यांनी मांडला. अशा परिस्थितीमध्ये विष्णुशास्त्र्यांचा गतवैभवाच्या पुनरुज्जीवनावर आधारलेला प्रतिगामी परंतु आक्रमक राष्ट्रवाद आगरकर, केशवसुतांचा क्रांतिनिष्ठ बुध्दिवाद यांचा महाराष्ट्रात उदय झाला.

आगरकरांनी लोकहितवादींच्या प्रमाणे इंग्रजी राजवटीचे आंधळे वा उत्स्फूर्त स्वागत केले नाही तर त्यांनी क्रांतिनिष्ठ बुध्दिवादाचा कट्टर पुरस्कार केला आणि नव्या युगाची ललकारी पुकारली. नव्या मूल्यांचे अत्यंत तर्कशुध्द समर्थन केले. हे समर्थन करताना त्यांनी पाश्चात्यांचे श्रेष्ठत्व मान्य केले पण आपले सामाजिक जीवन बुध्दिवादाच्या नव्या निकषांवर घासून पाहण्याचे धाडस केले. अनेक संकेतांवर प्रहार केले. रुढी परंपरांचे विच्छेदन केले. हे करत असताना त्यांनी कुणाचीही पर्वा केली नाही व क्रांतिवाद घडवून आणला.

2.2 (ब) केशवसुतांच्या काव्याचा परिणाम -

आगरकरांच्या या परंपरेमधून केशवसुतांचा उदय झाला. केशवसुतांनी काव्य-प्रांतात सुधारणावादाची "तुतारी" फुंकली आणि नव्या मनूतील नव्या शिपायाच्या हिरिरीने शेवटपर्यंत लढवय्येपणा पत्करले व म्हणाले -

"जुने जाऊ द्या मरणालागुनी
जाळुनि किंवा पुरुनी टाका."

असा निःशंकपणे त्यांनी पुकार केला.

म्हणजेच वसंत येऊ लागल्याच्या खुणा दिसू लागल्या होत्या. हळू हळू सूर्य उगवणार असल्याच्या खुणा दिसू लागल्या होत्या. झुंजुमुंजू होऊ लागले होते. केशवसुतांनी जुनी परंपरा, रुढी मोडली आणि नवीन वाट चोखाळली. कवितेच्या प्रत्येकच बाबतीत अंतरबाह्य स्वच्छंदता आणली. केशवसुतांच्या उदयाने मराठी कवितेची नवी पहाट उगवली.

ही नवी कविता प्राचीन कवितेपेक्षा अनेक अंगांनी वेगळी आहे. प्रेरणा आशय आणि अभिव्यक्ती या सर्वच दृष्टिकोनातून ही नवी कविता पूर्वीच्या

कवितेपेक्षा वेगळी आहे. रूढ काव्यसंकेतापेक्षा कवीचे व्यक्तिमत्त्व ही काव्यातील अधिक महत्त्वाची आणि प्रभावी अशी शक्ती ठरली. त्यामुळे कवीचे व्यक्तिमत्त्व ती काव्यातील केंद्रशक्ती ठरली व तिचा दिलखुलास व मुक्त आविष्कार होऊ लागला. नव्या युगाच्या आगमनाबरोबर आलेली व्यक्ति स्वातंत्र्याची नवी जाणीव हे आधुनिक मराठी कवितेचे वैशिष्टय ठरले. पूर्वीची कविता आणि केशवसुतांचे काव्य यामध्ये बराच भेद आहे. "प्राचीन कविता ही भक्तिपर, पौराणिक, आध्यात्मिक, पारलौकिक विषयांचा विचार करणारी बव्हंशी होती. नवीन कविता ऐहिक गोष्टीचा प्रामुख्याने विचार करु लागली. उदा. इ स. १८७० साली केशव सदाशिव रिसबूड या कवीने यशवंतराव भोसेकर नावाचे एक चांगले मामलतदार होते त्यांच्यावर पद्यात्मक "यशवंत चरित्र" लिहले. १८७५ साली बडोद्याचे मल्हारराव महाराजांना सरकारने पदच्युत करताच गो.आ.राजाध्यक्ष यांनी त्यांच्यावर "बडोदा कमिशन" नावाचा कटाव तयार केला. तसेच विष्णूशास्त्री चिपळूणकरांचा ऐन तारुण्यात मृत्यू होताच त्या प्रसंगावर दोन-तीन विलापिका प्रसिध्द झाल्या. त्याचबरोबर पाझर नदीच्या पुराने खानदेशातील एक गाव वाहून जाताच ह.कृ.दामले यांनी त्या प्रसंगावर "पार्वती प्रकोप" हे काव्य रचले. प्राचीन कवी स्वत: विषयी काव्यात काही सांगत नसत. त्याला काही अभंगाचा अपवाद दाखविता येईल. परंतु त्या आत्मपर अभंगात कवी बहुधा आपली निर्भत्सना करून ईश्वराची आळवणी करीत असे. आत्मपर गोष्टी सांगण्यात त्याचा आध्यात्मिक उन्नती हा हेतू असे. नवीन कविता त्याच्या उलट आडपडदा न ठेविता वैयक्तिक सुख-दु:ख, आशा-निराशा, राग-लोभ यांच्या गोष्टी सांगू लागली. डॉ.कीर्तीकर यांनी त्यांची पत्नी सौ.सोनाबाई हिचा मृत्यू होताच "विलापलहरी" हे करुणारसात्मक काव्य त्या प्रसंगावर लिहून त्यात अनेक खाजगी प्रेमाच्या गोष्टी सांगितल्या आहेत."[3] प्राचीन कविता ही बहुतांशी लांबलचक, पल्लेदार, खंडकाव्यासारखी किंवा महाकाव्यासारखी लिहलेली असे. नवीन कवीपैकी काहींनी खंडकाव्य किंवा

महाकाव्य लिहले असले तरी बहुतेक कवींनी इंग्रजी कवितांचे अनुकरणाच केले व स्फुट रचनाच पुष्कळ केली. विनायक कोंडदेव ओक यांची पुष्पवाटिका व विष्णू परशुराम पंडित यांची पुष्पमाला ही अगदी सुरवातीची स्फुट रचनेची उदाहरणे म्हणून सांगता येतात.

केशवसुतांनी सर्वच विषयात अंतरबाह्य क्रांती केली. साध्या विषयातही मोठा आशय आहे हे त्यांनी दाखवून दिले. संसारातील निरनिराळ्या प्रसंगी मनाची जी स्थिती होते त्या भावांना काव्यात स्थान दिले. पूर्वीप्रमाणे उदात्त व सुंदर हे काव्याचे विषय राहिले पण त्यातील कल्पना मात्र बदलल्या व त्यांची व्याप्ती वाढविली. साध्या क्षुल्लक समजल्या जाणा-या गोष्टीही काव्याचा विषय बनू शकतात. हे जाणवून दिले. त्याच बरोबर काव्य म्हटले की, त्याला "परतत्वाचा स्पर्श" हवाच, ही परंपराही मोडून काढली.

सामाजिक कवितातून समाजाचे प्रश्न मांडले व सामाजिक क्रांती घडवून आणली. समाजातील अनेक प्रश्नांना काव्यातून वाचा फोडली. समाजाने निर्माण केलेल्या जाचक रूढी परंपरेविरूध्द शस्त्र उपसले. सर्वसामान्य माणसाला त्यांच्या प्रश्नांना काव्यात स्थान दिले. बालविवाह, विधवा विवाह यांचेही प्रश्न काव्यातून मांडले. समाजाच्या प्रश्नाबरोबरच राष्ट्र-भावनेलाही त्यांनी आपल्या काव्यातून स्थान दिले. राष्ट्रभावना प्रबळ करण्याच्या हेतूने त्यांनी हे काव्य लिहले.

सामाजिक आणि राजकीय विचार काव्यातून मांडत असतानाच निसर्ग हा सुध्दा काव्याचा विषय होऊ शकतो हे सांगितले. प्राचीन मराठी काव्यातही निसर्गाला स्थान होते. पण स्वतंत्र काव्याचा विषय म्हणून निसर्गाला स्थान नव्हते. केशवसुतांनी निसर्गाला स्वतंत्र स्थान काव्यात दिले. निसर्गालाही स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे, चेतनारूप आहे ही जाणीव करून दिली व म्हणतात -

"जेथे ओढे वनराजी । वृत्ति रमे तेथे माझी"

हे सांगत असताना निसर्गातील खरा अनुभव व्यक्त करावा असेही म्हणतात. "निसर्ग म्हटला की तो सौन्दर्याने नटलेला हवा अशा रूढ कल्पनेच्या दडपणाखाली कृत्रिम आनंदाची कविता न रचता, त्या त्या वस्तुदर्शनाची मनावर झालेली बरीवाईट प्रतिक्रिया व्यक्त करावी."४ असेही म्हणतात.

इतर अनेक कल्पनांप्रमाणेच प्रेम कवितांच्या बाबतीतही त्यांनी रूढ कल्पनांना धक्का देऊन प्रेमकाव्यात क्रांती घडवून आणली. यापूर्वी प्रेम काव्य लिहली जात होती पण त्यांचे विषय म्हणजे राधा-कृष्णादी देवादिक हेच होते. सामान्य माणसाच्या प्रेमभावनेला स्थान प्रेमकाव्यात नव्हते. केशवसुतांनी ही कोंडी फोडली आणि तरूण मनाने आपल्या प्रेमविषयक उर्मी नि:संकोचपणे काव्यात व्यक्त कराव्यात अशा प्रकारचे विचार मांडले. सर्व-सामान्य माणसाचे प्रेम हा ही काव्याचा विषय होऊ शकतो हे दाखवून दिले.

त्याच बरोबर या नवकवितेत आत्मनिष्ठेला अधिक महत्त्व आले. जणू काही आत्मप्रत्यय हाच तिचा स्वधर्म ठरला. कवीच्या भावनेचा, अंतकरणाचा, जीवनविषयक दृष्टिकोनाचा जास्तीत जास्त अविष्कार या नवीन कवितेत दिसू लागला. निर्भरशीलता हे केशवसुत निर्मित काव्याचे लक्षण म्हणता येईल. या निर्भरशील कवितेविषयी प्रा. गो. वि. करंदीकरांनी केलेले भाष्य लक्षात घेण्यासारखे आहे. करंदीकर म्हणतात - "व्यक्तिविशिष्ट अनुभवांचे प्रकटीकरण, दलितांविषयीची सहानुभूती, तत्त्वत्रयीवर आधारलेला ध्येयवाद, अनागर जीवनाचे व निरागस बाल्याचे उदात्तीकरण, निसर्गाचे चेतनीकरण व दैवीकरण, बुध्दीच्या नियामक शक्तीऐवजी आदि प्रेरणांच्या सहजोर्मींवरील विश्वास, प्रत्यक्षाचे परोक्षीकरण व परोक्षाचे प्रत्यक्षीकरण, यांत्रिक कल्पकतेपेक्षा प्राणीसदृश एकात्मता असलेल्या कल्पनाशक्तीचा आश्रय व विश्लेषणात्मक भाषेपेक्षा गोचर भाषेचा उपयोग, या सर्वांशी संवादी ठरणाऱ्या जुन्या वाङ्मय प्रकारांचा वृत्तांचा पुरस्कार करणारी आणि नव्याची निर्मिती

करणारी सृजनशीलता अशा निरनिराळ्या गोष्टींचे साहचर्य निर्भयशील काव्यामध्ये कमीअधिक प्रमाणात दृष्टीस पडते."[५]

काव्याच्या प्रकारात अशा प्रकारची विविधता आणीत असतानाच "गूढगुंजना" या एक चिमुकला प्रवाहही केशवसुतांनी आधुनिक मराठी कवितेत आणून सोडला. जीव, जगत, ईश्वर यांच्या संबंधी मानवी मनाला नेहमीच एक प्रकारचे गूढ वाटत आले आहे. सर्वसामान्य माणसाच्या बुध्दीच्या कक्षेत न येणाऱ्या इंद्रियांना सर्वस्वी गोचर नसलेल्या अशा जगातील अनेक गोष्टी-विषयी मानवी मनाला नेहमीच कुतूहल असते. त्या कुतूहलापोटी निरनिराळे तर्क लावले जातात आणि हे तर्क लावताना मनाची जी एकाग्रता, तल्लीनता होते तिला शब्दबध्द करण्याचा प्रयत्न केशवसुतांनी केला आहे. आणि "गूढगुंजना" सारख्या काव्यप्रकाराचा लाभ आधुनिक मराठी कवितेला करून दिला.

इंग्रजी कवितेच्या अनुकरणाबरोबर इंग्रजी कविता प्रकारांचाही मराठीतून स्वीकार सुरु झाला आहे हे आपण पहात आलोच. त्यातून सुनित (सॉनेट) हा प्रकारही आला. "सुनित" या काव्यप्रकाराचाही केशवसुतांनी आधुनिक मराठी कवितेला लाभ करून दिला. मूळ इंग्रजीत "सुनित"चे दोन प्रकार -
१) शेक्सपियरन सॉनेट, २) मिल्टन्स सॉनेट.

सॉनेटला मराठीत आशय आणि उच्चार सदृश्य असा "सुनित" हा शब्द योजिला गेला आणि कालांतराने तो दृढ झाला. "सुनित" या काव्यप्रकारात एकूण चौदा ओळी असतात. यांचे स्थूलपणाने दोन विभाग कल्पितात. पहिल्या भागात जी भावना किंवा विचार मांडलेला असतो त्याचाच अधिक विस्तार दुसऱ्या भागात केलेला असतो. हा विस्तार मूळच्या भावनेला कलाटणी देऊन साधल्याचा प्रयत्न केला जातो.

शेक्सपियरच्या सॉनेटमधे चार-चार ओळींची तीन कडवी व शेवटचे कडवे दोन ओळींचे असते व त्यात वरील कल्पनेला कलाटणी दिली जाते. या कडव्यात यमकांची ठेवणही विशिष्ट पध्दतीने केली जाते. कधी कधी एक-दोन

यमक यांचे यमक एक आणि तीन व चार तर कधी एक आणि चार, दोन आणि तीन तर कधी एक आणि तीन, दोन-चार अशी कवींच्या सोयीप्रमाणे यमक रचना आढळते.

मिल्टनच्या काव्यात सहा आणि आठ ओळींचे किंवा आठ आणि सहा ओळींचे असे दोन भाग असतात.

केशवसुतांनी विशेषत: शेक्सपियरन प्रकार मराठीत अधिक रूढ केला.

केशवसुतांनी केलेल्या क्रांतीतील कवितेमधे अंतरंगदृष्टया झालेल्या बदलाचा आपण थोडक्यात आढावा पाहिला. पण ही क्रांती केवळ आंतरिक स्वरूपाची नव्हती तर बाह्यस्वरूपाचीही होती. अंतरंग जसे महत्त्वाचे होते त्याचप्रमाणे बाह्यांगामधे झालेले परिवर्तनही लक्षणीय होते.

पूर्वीच्या कवितेच्या मानाने केशवसुतांनी निर्मिलेली कविता विस्ताराने बरीच लहान असे. पूर्वीच्या कवितेत कथानिवेदन, प्रसंगचित्रण असल्यामुळे सहाजिकच ती विस्तृत प्रमाणात असे. काही वेळेस श्लोकबध्द असेल तर पाच पंचवीस श्लोकांची असे. मात्र नवीन कविता ही कवीच्या भावनेच्या उद्गाराची असल्यामुळे भावने एवढीच लहान असे. लहान या अर्थाने तिला "स्फुट" म्हटले गेले. भावना जास्त काळ टिकत नाही म्हणून नव कवींनी भावगीते लिहिली. कविता म्हटली की, ती लांबी रुंदीने चांगली बहारदार असली पाहिजे ही कल्पना जाऊन भावगीतास योग्य तेवढयाच मर्यादेची असावी ही कल्पना मांडली गेली. तिच्या या मर्यादित स्वरूपामुळे तिच्याबद्दल तक्रारीही आल्या. कविता वाचावयास प्रारंभ होतो न होतो, तोच तिचा शेवटही येतो अशा तक्रारी ऐकू येत. तिच्या मर्यादितपणावर अच्युत बळवंतराव कोल्हटकर थट्टा करतात ती अशी -

"एवढ्याशा न्हाणावळीला एवढे मोठे मखर कशास हवे."[६]

अशा थट्टांचा विचार न करता केशवसुत बाह्यांगामधेही क्रांती करीत राहिले.

रचनाविषयक प्रयोग करण्याचे धाडस म्हणा साहस प्रथम केशवसुतांनी दाखविले. व निर्यमक रचना करण्याचा पाया केशवसुतांनी पाडला आणि यमकाचे बंधन जुगारून दिले. "कवी कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्रदेशा" असा गडकऱ्यांनी आपल्या "महाराष्ट्रगीत" या कवितेत केशवसुतांच्या निर्यमक रचनेच्या प्रयोगाचा उल्लेख केला आहे." ७ त्याचबरोबर केशवसुतांनी कवितेचा मोहरा अक्षरगणात्मक रचनेकडून मात्रारचनेकडे वळविला. नुसता वळविलाच नाही तर काही बंध जाणीवपूर्वक निर्माण केले. नवीन कवितेचे मुख्य वाहन मात्रावृत्ते किंवा जातिप्रकार आहे.

अशा प्रकारे केशवसुतांनी आचार विचारात आमूलाग्र बदल करून काव्यात अंतर्बाह्य क्रांती घडवून आणली.

थोडक्यात केशवसुतांनी जवळ जवळ काव्याच्या सर्वच क्षेत्रातली अंतरंग आणि बाह्यांग सुध्दा बदलले. आपल्या काव्यातून जुन्या रुढी, परंपरा, जुलूम यांचा निषेध व्यक्त करून रुढी, परंपरे विरुध्द शस्त्र उपसले व स्वतंत्र काव्य निर्माण केले. कीर्तीसाठी मागणी तसा पुरवठा न करता स्वत:ला आनंद देईल असे काव्य निर्माण करण्याची प्रथा सुरू केली. असे काव्य निर्माण करीत असताना इतर जनांची पर्वा केली नाही.

इंग्रजी विद्येच्या सेवनाने काही लोक पाश्चात्य कल्पनास संस्कृतीस भुलून सुधारक बनण्याचा प्रयत्न करत होते. पाश्चात्यांचे स्वैर अनुकरण करत होते. आहारात, पोशाखादी काही बाबतीत पुष्कळ अनुकरण करत होते. नुसते अनुकरणच करत होते असे नाही तर तोंडाने पाश्चात्यांचेच विचार बोलत होते. पण जुन्या रुढी परंपरेची पकड त्यांच्या अंतरंगावर होतीच ते तोडण्याचे सामर्थ्य मात्र त्यांच्यात नव्हते.

आणि ते तोडण्याचेच काम केशवसुतांनी केले. केशवसुत इंग्राळले होते पण इंग्रजी झाले नव्हते. इंग्रजी कल्पनांचा त्यांच्या मनावर पगडा होता पण काही जुन्या गोष्टींची पकडही कायम राहिली होती. त्यामुळे वृत्तीने जहाल पण कृतीने मवाळ अशी त्यांची स्थिती झाली होती. त्यामुळे आपल्याला

आवडणारे विचार ते स्वाभिमानपूर्वक मराठीत प्रकट करण्याचा प्रयत्न ते करीत होते.

हेच केशवसुतांचे स्वातंत्र्य होय. त्यांच्या कवितेत कित्येकांना नाविन्य दिसले, खडबडीत रांगडेपणात सामर्थ्य वाटले. जगाच्या सुखदु:खाकडे पाठ न फिरवता त्यांची सुखदु:खे केशवसुतांनी काव्यातून सुंदर भाषेत मांडली. लक्षावधी लोकांच्या मुक्या भावनांना केशवसुतांनी आपल्या काव्यात वाचा फोडली. अंतरबाह्य काव्य पालटून नवीन मराठी काव्यात पूर्व रुढी परंपरेचा कुठे मागमूसही ठेवला नाही म्हणूनच ते म्हणतात -

"जुने जाऊ द्या मरणालागुनि
जाळुनि किंवा पुरुनी टाका
सडत न एक्या ठायी ठाका
सावध ! ऐका पुढल्या हाका."

केशवसुतांना नवीन काहीतरी निर्माण करायचे आहे त्यासाठी त्यांची धडपड आहे. आणि ही धडपड अगदी मनापासून आहे. त्यामुळेच केशवसुत अगदी पेटून उठले आहेत. त्यामुळेच ते म्हणतात हे निर्माण करताना -

"अडवतील जरि देव, तरी
झगडू त्यांच्याशी निकरी
हार न खाऊ रतीभरी."

असा निर्धार बाळगणारा हा कवी आहे आणि शेवटी

"देवदानवा बरे निर्मिले हे मत लोका कवळू द्या !
काठोकाठ भरू द्या पेला फेस भराभर उसळू द्या !
पद्य पंक्तिची तरफ आमच्या करी विधीने दिली असे !
टेकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुनिया देऊ कसे !
बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देऊनि जुलमाचे या करू पहा तुकडे तुकडे !"

SAHR. BA... ...KAR LIBRARY
...IVI ...HAPUR

अशी बंडखोरी करणारे प्रखर उद्गार काढले आहेत. या सर्व अर्थाने केशवसुत एक क्रांतिकारक कवी आहेत. त्यांच्या या क्रांतीचा परिणाम काव्याच्या विविध प्रकारांवर झालेला आपण पाहिलाच आहे.

"केशवसुतांनी केवळ आपल्या प्रतिभेच्या आणि स्फूर्तीच्या सामर्थ्यावरच महाराष्ट्र कवितादेवीच्या प्रदेशात, तत्पूर्वीचे सारे चोखाळलेले मार्ग सोडून देऊन नवाच स्वतंत्र मार्ग काढला." असे त्यांचे मित्र किरात म्हणतात.[८]

ते एकटेच म्हणतात असे नाही तर केशवसुतांचे नाव निघाल्या बरोबर असे विधान करण्याची रुढीच पडली आहे.

डॉ. गुणे म्हणतात -

"केशवसुतांच्या सर्व कल्पनांच्या मुळाशी स्वातंत्र्य तत्त्व आहे व म्हणूनच त्यांचे काव्य जिवंत, जिव्हाळ्याचे व हलवून सोडणारे असे आहे." [९]
अशा प्रकारची क्रांती करताना त्यांच्या मनावर व काव्यावर विशेषत: न्या. रानड्यांच्या उदारमतवादांचे आणि आगरकरांच्या सुधारणावादी विचारसरणीचे गाढ संस्कार झालेले दिसतात.

## 2.3 (क) या काळातील अन्य कवी १९०० ते १९४०

केशवसुतांनी काव्याच्या क्षेत्रात अंतर्बाह्य क्रांती केली हे आपण मागील भागात पाहिलेच आहे. या क्रांतीचे पडसाद कित्येक वर्ष उठत होते. त्याचे परिणाम त्यांच्या समकालीन कवीवर तर झालेच पण पुढील अन्य कवीवरही झाले. या झालेल्या परिणामावरून केशवसुत हे कसे युगप्रवर्तक ठरले हे आपणास कळून येते.

संत कवींनी मराठी कवितेला भक्तीचे स्वरूप देऊन वरकरी बनविले, तर शाहिरांनी या कवितेला नर्तकीचे स्वरूप दिले. परंतु केशवसुतांनी मात्र आधुनिक मराठी कवितेला खरीखुरी गृहिणी बनविले. त्यामधे मुख्यता काव्याचा महिमा, प्रणयाची भावना, राष्ट्रमातेची भक्ती आणि निसर्गाचे प्रेम या विषयांनी त्यांची सारी काव्यसृष्टी व्यापलेली दिसते. तरी

"मराठीचा परिमल" या ग्रंथात द.ना. शिखरे म्हणतात -
"एखाद्या बारीक फुलापासून व लहानशया खेड्यापासून ज्ञानाच्या कुंपणापलिकडे असलेल्या गूढ शक्तीपर्यंत व दिव्य तेजापर्यंत केशवसुतांची प्रतिभा भरारी मारीत असे." [१०] त्यांच्या ब-याच कविता महाराष्ट्र शारदेला भूषणावह ठरणा-या आहेत. केशवसुतांच्या कवितांनी आधुनिक मराठी काव्याचा प्रांत समृध्द बनविला आहे. त्यांच्या तुतारीचे पडसाद तर गेली साठ वर्षे मराठी काव्यसृष्टीत उमटत आहेत. गडक-यांचा "दसरा", रे. टिळकांचे "रणशिंग", बालकवींची "धर्मवीर", आणि "बी"ची "डंका" म्हणजे तर त्याच "तुतारी"ची अपत्ये वाटतात.

"पर्वताच्या गगनचुंबित शिखरावर सूर्याचे आरक्त किरण अगोदर पडतात व मग ते इतर ठिकाणी पसरतात त्याचप्रमाणे मराठी काव्यसृष्टीतील नवयुगाचा साक्षात्कार केशवसुतांना अगोदर झाला व मागाहून येणा-या इतर कवींना त्याची प्रचीती आली. म्हणूनच केशवसुतांना सर्वांनी गुरुस्थानी मानले व त्यांच्यावर स्तुतीची सुमनांजली वाहिली." [११]

केशवसुतांनी जे विविध प्रवाह आणून सोडले त्या प्रवाहाबरोबर त्यांचे समकालीन कवी तर वाहत गेलेच पण त्यांचा परिणाम इतर अन्य कवीवरही झाला. जवळ जवळ त्या काळातील सर्वच कवींनी केशवसुतांना गुरुस्थानी तर मानलेच पण गोविंदाग्रजांसारख्या महान कवीसुध्दा स्वत:ला केशवसुतांचा सच्चा चेला म्हणवून घेत असे. त्यांच्या काव्याचा परिणाम त्यांच्या समकालीन कवीवर व अन्य कवीवर कसा कसा होत गेला ते आपण थोडक्यात पाहू.

(१) <u>रे.नारायण वामन टिळक (१८६२ ते १९१९)</u> -

केशवसुतांचे समकालीन कवी आणि मित्र केशवसुतांपेक्षा चार वर्षांनी वडील प्रासादिक काव्यरचना करणारे कवी म्हणून तसेच फुलामुलांचे कवी म्हणून टिळक महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. केशवसुतांच्या काव्याचा

परिणाम टिळकांच्या काव्यावरही झाल्याचे दिसून येते. "ज्या काळात केशवसुतांच्या मनात धर्मांतराचे विचार येत होते त्याच काळात रे. टिळकाचे मन ख्रिस्ती धर्मचिंतन करीत होते. पुढे केशवसुत सावरले आणि रे. टिळकांनी मात्र धैर्याने पत्नी लक्ष्मीबाईसह धर्मांतर केले." १२

रे. टिळकांनी धर्मांतर जरी केले असले तरी मायभाषेचा लळामात्र त्यांना आमरण होता. ते ख्रिस्ती धर्मात गेले तर त्यांचे मराठी भाषेवरील प्रेम कायम होते. त्यांनी स्वत: तर मायभाषेची सेवा आजन्म केलीच पण आपल्या ख्रिस्ती बांधवांचेही तोंड इंग्रजीकडून मराठीकडे वळविले.

केशवसुतांच्या काव्याचा परिणाम टिळकांवरही ब-याच बाबतीत झालेला दिसून येतो. केशवसुतांनी ज्याप्रमाणे काही इंग्रजी कवितांचे रूपांतर मराठीत केले त्याचप्रमाणे टिळकांनी देखिल भाषांतर केलेले दिसून येते. सामाजिक अन्यायाचा तिटकारा ज्याप्रमाणे केशवसुतांना होता त्याचप्रमाणे टिळकांनी देखिल आपल्या काव्यातून व्यक्त केला आहे. केशवसुतांनी "तुतारी" फुंकताच टिळकांनी "रणशिंग", "बोंबाबोंब" ही काव्ये लिहली त्याचवेळेस "बी"नी देखिल आपले सामाजिक विचार "डंका" तीव्र जाणिव मधून मांडले अशी काव्ये लिहून त्यांनी सामाजिक अन्याय वेशिवर टांगले पण केशवसुताइतकी पोटतिडकी यांच्या काव्यातून दिसत नाही.

केशवसुतांनी समतावादाचा पुरस्कार जोरात केला म्हणूनच ते "नवा शिपाई" या कवितेत म्हणतात -

"ब्राम्हण नाही, हिंदुही नाही, न मी एक पंथाचा"

त्याचप्रमाणे टिळकांनीही समतावादाचा पुरस्कार करून लिहितात -

"नहि हिंदू हि, जैन मी न, अथवा बुध्दैकसेवी तसा"

(ब्राम्हण किंवा महार)

नव्या काव्याविषयी व कविंविषयी गौरवपर कविता दोघांनीही लिहल्या.

13367
A

आधुनिक मराठी कवितेला ज्यांनी नवे वळण दिले व तिच्या पूर्वीच्या स्वरूपात बदल केला अशा कवीत रे. टिळकांची गणना केली जाते. प्रा.लागू यांनी म्हटल्याप्रमाणे - "काव्य प्रदेशात क्रांती घडवून आणणाऱ्या कवीत जरी बंडाचा झेंडा टिळकांनी उभारला नसला तरी ते बंडखोरीच्या चळवळीचे एक पुरस्कर्ते होते यात शंका नाही."[१३] रे. टिळकांप्रमाणेच कवी "बी" हे तत्वज्ञ असल्यामुळे त्यांच्या काव्यात तत्वज्ञानाचा विलास व तत्वज्ञानात काव्याचा विलास आढळतो.

(२) <u>गोविंदाग्रज १८८५ ते १९१९</u> -

प्रेमाचे शाहिर, सुप्रसिध्द नाटककार, कल्पनेचे कुबेर त्याचप्रमाणे विनोदी निबंधकार म्हणून गडकरी लौकिक आहेत. "राजहंस माझा निजला" या करूणरम्य गीताचे कवी म्हणून ते महाराष्ट्राला परिचित आहेत.

गोविंदाग्रजांवर केशवसुतांच्या काव्याचा पगडा इतका बसला होता की, ते स्वतःला केशवसुतांचा सच्चा चेला म्हणवून घेत असत. केशवसुतांची आधुनिक काव्यात काव्याचे जे विविध प्रवाह आणून सोडले त्यात प्रेमाचा पुकार त्यांनी आपल्या काव्यातून केला. तरूणांच्या प्रेम भावना व्यक्त करण्याची रुढी केशवसुतांनी घालून दिली. तिचा पुरेपूर उपयोग गोविंदाग्रजांनी केला आणि ते प्रेमाचे शाहीर बनले. इतर विषयावर त्यांनी कविता लिहल्या नाहीत असे नाही पण ते प्रेमकवी म्हणून गाजले. प्रेमाचे विविध रंग त्यांनी आपल्या काव्यातून उलगडून दाखविले. प्रेमरसाने काठोकाठ भरलेले मधूर असे काव्य गोविंदाग्रजांनी रचले आहे. "मी प्रेमाचा बंदा, माझा हाच असे धंदा" अशी आपली भूमिका त्यांनीच "प्रेमपाठ" या कवितेत मांडली आहे. हा "प्रेमाचा भाट" निरनिराळ्या रूपांनी प्रेमाचा महिमा गाताना दिसतो.

गोविंदाग्रजाप्रमाणे कवी "बीं"नी सुध्दा प्रेम कविता लिहल्या पण ते प्रेमाचे शाहिर बनले नाहित. प्रेमासाठी जान कुर्बानी त्यांनी केली नाही.

त्यामुळे गडकऱ्यांच्या प्रेमाची दाहकता जशी चटका लावून जाते तशी "बीं"ची कविता वाटत नाही. सदैव चिंतन करणारे असल्यामुळे त्याचप्रमाणे कमालीच्या संयमामुळे त्यांची कविता सदैव उदात्ततेच्या उत्कट पातळीवरच वावरताना दिसते. तरीही "बीं"च्या "बकुल", "बुलबुल" या प्रेमकविता चांगल्या असून "चाफा" हे सर्वोत्कृष्ट प्रेमगीत आहे.

नवयुगाची प्रस्थापना करण्याची तळमळ केशवसुतांच्या "तुतारी"त आहे तशीच गडकऱ्यांच्या "दसरा" मध्ये रूढीविरुद्ध बंड पुकारलेले आहे. म्हणून "जुन्या मताचा जाळा कचरा" अशी ललकारी देऊन जुन्या ऋषींना आता सलाम ठोकला पाहिजे, "अंधभक्तीचा पांगुळगाडा" मोडून तोडून टाकला पाहिजे, पूर्वजांची नसती फुशारकी मिरवणे सोडून दिले पाहिजे व सामाजिक समता प्रस्थापित केली पाहिजे."[१४] इ. विचार त्यांनी केशवसुतांच्या पावलावर पाऊल ठेवून मांडलेले आहेत. त्याचप्रमाणे केशवसुतांच्या

"काळोखाच्या जगामधे या मृत आशांच्या चितारुनिया
पिशाच माझे भटकत राहे । शांति नसेचि तया"

या ओळीतील कल्पना गडकऱ्यांच्या

"सुख मरणाचे सापडले । ऐकत असता मी मेलो ।
प्रेतावरी माझ्या बसलो."

(कलगीचे गाणे)

या कवितेत दिसते. यावरून आपल्याला केशवसुतांच्या काव्याचा परिणाम त्यांच्या समकालीन कवींवर झालेला दिसून येतो.

(३) <u>बालकवी १८९० - १९१८</u>

बालकवींना "सृष्टीचे शाहीर" असे म्हटले तरी काही वावगे ठरणार नाही. निसर्गालाही सजीव करणारा भावकवी म्हणून बालकवींचा लौकिक आहे. त्याचबरोबर निसर्गाशी तादात्म्य पावणारा असा हा कवी आहे. बालकवींचे नाव उच्चारताच निसर्ग कवी असे डोळे झाकून उत्तर येते आणि

त्यांच्या काव्यातील ओळी आपल्या ओठावर रेंगाळतात.

"सुंदरतेच्या सुमनावरचे दवं चुंबुनि घ्यावे
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे."

निसर्गाला काव्यात चैतन्यरूप केशवसुतांनी दिले आणि बालकवींनी आपल्या काव्यातून सजीव असा निसर्गच उभा केला. केशवसुतांनी मराठी कवितेचे रूप पालटून टाकले आणि त्यांनी दाखवून दिलेला आत्मनिष्ठेचा मार्ग धुंडाळीत गडकरी, टिळक, रेंदाळकर, बालकवी, विनायक यांची कविता पुढे सरसावली.

बालकवींनी निसर्ग डोळे भरून पाहिला, भोगला, एवढेच नव्हे तर त्याचा मनमुराद आनंद घेतला. ते निसर्गाच्या संगतीत हसले, बागडले, खेळले, बालपणापासून ते जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत ते निसर्गाच्याच सहवासात वाढले. निसर्ग हे बालकवींचे जीवन होते. निसर्गात त्यांनी स्वत:ची प्रतिबिंबे पाहिली, म्हणूनच त्यांचे जीवन आणि त्यांची निसर्ग कविता यांच्यात अद्वैत दिसते.

कवी "बी"नी ही निसर्ग कविता लिहल्या पण बालकवीइतके ते निसर्गाशी एकरूप होऊ शकले नाहित, अथवा एखाद्या निसर्ग दृश्याने झपाटून जाऊन त्यांची कविता उतरली नाही. निसर्गापेक्षा त्यांच्या काव्यात स्वत:च्या प्रकृतीचेच प्रतिबिंब त्यात पडलेले दिसते. सुंदर दृश्ये पाहून त्यांना काव्यस्फुरते परंतु त्यांची प्रतिभा त्या दृश्याचे वर्णन करण्यात पूर्णत: रमत नाही. ती सौंदर्याचा आस्वाद घेत असतानाच त्यांची तत्वज्ञ वृत्ती जागृत होते. आणि त्यांच्या काव्यात विचार प्रगट होताना दिसतात. तरीही बालकवींच्या "बाल विहग" सारख्या कवितेच्या छटा त्यांच्या काव्यात दिसतात. त्यांनी दोन तीनच निसर्ग कविता लिहल्या पण त्या उत्कृष्ट उतरलेल्या आहेत.

(४) विनायक १८७२ ते १९०९ -

राष्ट्रीय कवितेचे पहिले उद्गाते म्हणून विनायकांचा गौरव केला जातो. तसेच "राष्ट्रीय कवी" म्हणून वाचकांना विनायकांची ओळख आहे. विनायकांच्या काव्यात जितक्या व्यापक प्रमाणात राष्ट्रीय जीवनाचे प्रतिबिंब पडलेले दिसते

तितक्या व्यापक प्रमाणात इतर कवींच्या काव्यात आढळत नाही. त्यांना स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांचा नितांत आदर होता. अभिमान होता. आपल्या देशाचे यशोवर्णन करण्यात त्यांनी आपली वाणी वाहिली आहे. प्रा. वा. बा. पटवर्धन यांनी म्हटल्याप्रमाणे - "महाराष्ट्राच्या दिव्य पूर्वे-तिहासाची आठवण त्यांनी महाराष्ट्राला करून दिली आहे. आणि महाराष्ट्रातील स्त्रीवर्गापुढे ओजस्वीतेचे आदर्श ठेविले आहेत. त्यामुळे त्यांना "राष्ट्रीय कवी" असे यथार्थाने म्हटले जाते."[१५] विनायकांच्या काव्यात स्वातंत्र्याची लालसा व पारतंत्र्याचा तिटकारा पराकाष्ठेचा आढळतो.

विनायकांच्या दोन निष्ठा प्रबळ होत्या एक राष्ट्रनिष्ठा, दोन काव्यनिष्ठा. समकालीन कवी वेगळ्या प्रकारचे काव्य करीत असताना विनायक देशप्रेमी गाणी गात केशवसुतांची "आम्ही कोण ?", "तुतारी", रे. टिळकांचे "पुरे जाणतो मीच माझे बळ" या कविता उदाहरणादाखल दाखविता येतील. पण विनायक मात्र अतिशय विनम्रपणे म्हणतात -

"महाकवी थोर नदीप्रमाणे । मी बापडा ओघळ काव्य जाणे ।
धाके न ओढा झुळझूळ वाहे । माझी तशी ती गुणगुण आहे ।।"[१६]

विनायकांप्रमाणेच कवी "बीं"नीही राष्ट्रीय कविता लिहल्या आहेत. त्यांच्या अंत:करणातील राष्ट्रप्रेम त्यांच्या विविध काव्यातून उत्कट झालेले दिसते. त्यांच्या "तीव्र जाणीव" या कवितेत विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे दर्शन आपल्याला घडते.

(५) दत्त १८७५ ते १८९९ -

इंग्रजी कवितेच्या सहवासाने मराठी कवितेला जे नवे वळण लागले होते ते दत्तांच्याही कवितेत थोड्याफार प्रमाणात उमटलेले दिसते. देशभक्ती, प्रेममहात्म्य, सृष्टीप्रेम वगैरे विषय इंग्रजी कवितेमुळे मराठी काव्यप्रांतात शिरले

तसेच ते दत्तांच्या काव्यातही शिरले.

भारताच्या ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचे चित्र दत्तांनी "निज नीज माझ्या बाळा" या सुप्रसिध्द अंगाई गीतातून रेखाटले आहे. एक दरिद्री माता आपल्या लाडक्या तान्हुल्याला अंगाई गीत गातानाच परिस्थितीची जाणीव करून देत आहे. तुझ्यासाठी मी केवळ दारिद्र्याची रास हेच धन ठेवले आहे. मात्र शेवटी त्याला सत्यनिष्ठा आणि ईश्वरनिष्ठा बाळगण्याचा उपदेश दिला आहे. शिशुगीतामुळे त्यांचे नाव मराठी कवितेच्या इतिहासात अजरामर झाले आहे.

दत्तांनी आपला काव्यासंबंधीचा दृष्टिकोन सांगितला आहे. ते म्हणतात -

"प्रगति आणि काल यांच्या अनुरोधाने कवितेची सुधारणा झाली पाहिजे. पूर्वीची पौराणिक पध्दती आता आवडत नाही. मनोविकारांचे चित्रलेखन, सृष्टीसौंदर्याचे वर्णन आणि ऐतिहासिक ठळक प्रसंगाचे वर्णन वगैरे गोष्टी अर्वाचीन काळास सिध्द आहेत व त्यांचा त्याने यथोचित उपयोग करून घेतला पाहिजे. कविता केवळ मनोरंजनाकरिता नसून तिचा दुसरा महत्वाचा कार्यभाग आहे. एकंदर समाजास उन्नत विचार मनोरंजक रीतीने समर्पण करून त्याच्या उच्च मनोवृत्ती जागृत करणे हे ख-या कवीचे कर्तव्यकर्म आहे."[१७] त्यांनी अशा प्रकारचे कार्य करून यश मिळविल्याचे दिसते. त्यांनी प्रेमविषयक राष्ट्रीय कविताही लिहल्या आहेत. त्याचबरोबर तीन चार शिशुगीतेही दत्तांनी लिहली आहेत. "शहाणी बाहुली", "बोलत का नाही?", "अ आई" डॉ.माधवराव पटवर्धन म्हटल्याप्रमाणे "आधुनिक मराठी कवितेत वात्सलरसाचा हा सुंदर प्रवाह आणून सोडणा-या कवितात दत्तांच्या प्रतिभेचे वैशिष्टय सामावलेले आहे."[१८]

(६) <u>रेंदाळकर १८८७ ते १९२०</u> -

केशवसुतांच्या काव्याचे रेंदाळकर भोक्ते होते, चाहते होते व काही

अंशाने अनुकरण करणारे होते. "केशवसुतास" या कवितेत त्यांनी केशवसुताविषयीचा आपला आदर व्यक्त केला आहे.

"आहे साथ करावयास बसलो राहून मागे तुझ्या
हर्षे देईन भीतभीतच कधी त्वदगायना सूरही."

सामाजिक सुधारणाविषयक लिहणे, प्रेमविषयक, आत्मपर काव्य रचणे, सृष्टीविषयक कविता लिहणे या गोष्टी त्यांनी केशवसुतांपासूनच घेतल्या. याशिवाय काही भाषांतरेही केली आहेत.

केशवसुतांनी ज्या स्वातंत्र्यवादाचे निशाण फडकविले तो स्वातंत्र्यवाद काव्याच्या प्रांतात आणण्यासाठी रेंदाळकरांनी फार कष्ट केले. काव्यात निरनिराळी बंधने हवीत कशाला ? असा जेंव्हा सवाल निर्माण झाला तेव्हा रेंदाळकरांनी बंधन जुगारून देण्याचा अटोकाट प्रयत्न केला. आंधळ्या जुन्या रुढी परंपराभिमानावर कठोर टीका केली. त्याचप्रमाणे स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले पाहिजे हा विचारही त्यांनी आपल्या काव्यातून मांडला आहे.

केशवसुतांच्या "झपूर्झा" च्या तालावर त्यांनीही "झपूर्झा" गीत गायिले पण केशवसुतांप्रमाणे ते आपल्या गीताला गूढरम्यतेचे आणि चिंतनशिलतेचे अधिष्ठान देऊ शकले नाहीत. केशवसुतांनी आधुनिक मराठी कवितेला जे नवे वळण लावले ते आत्मसात करण्याचा बराच प्रयत्न रेंदाळकरांनी केला आहे.

(७) <u>चंद्रशेखर - १८७१ ते १९३७ -</u>

चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे हे मूळचे नाशिकचे. चंद्रशेखर हे वयाने माधवानुज, विनायक, तांबे यांच्या बरोबरीच पण या कवींवर इंग्रजी काव्याचे परिणाम कमी अधिक प्रमाणावर झालेले आढळतात तसे चंद्रशेखरांवर झालेले दिसत नाहित. त्यांचा पिंड प्राचीन भारतीय अभिजात वाङ्‌मयावरच पोसलेला होता, त्यांच्या काव्यावरुन दिसून येते. त्यांच्या काव्याचे वळण जुन्या पंडिती काव्याचे वाटते.

कवी "बी" प्रमाणेच चंद्रशेखरांचा पिंड वैचारिक असल्याचे वाटते. "बी" प्रमाणेच त्यांच्या काव्यात भावनांना स्थान असले तरी त्या भावनेचे रूपांतर ते चिंतनात करतात. ज्याप्रमाणे "बीं"नी स्वत:ची सुख दु:खे कवितेत उमटू दिली नाहीत त्याचप्रमाणे चंद्रशेखरांना स्वत:च्या सुख दु:खांना वासनाविकारांना कुरवाळीत बसणे त्यांचा उघडा नागडा अविष्कार करणे त्यांना असंस्कृतपणाचे वाटत असे. त्यामुळे त्यांच्या काव्यात पावित्र्य, प्रसन्नता व प्रसाद यांचा त्रिवेणीसंगम झालेला दिसून येतो.

महाकाव्य लिहिण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होते, पण परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळे ते त्यांच्या हातून लिहले गेले नाही. चंद्रशेखरांचे नाव सर्वतोमुखी झाले ते त्यांच्या "काय हो चमत्कार!" या अद्भुत अशा कथाकाव्यामुळे.

त्यांनी काही राष्ट्रीय कविताही लिहल्या आहेत. त्याचप्रमाणे केशवसुतांनी ज्याप्रमाणे "कवितेचे प्रयोजन" सांगून कवीची राष्ट्रीय जीवनातील उपयुक्तता सिध्द केली तशीच"कविसंदेश" या कवितेतून चंद्रशेखरांनी सांगितली आहे.

त्यांच्या काव्यातील गंभीरता पाहून श्री.माडखोलकर म्हणतात - "त्यांचे ते गंभीर पण प्रसन्न सौंदर्य पाहिले म्हणजे मुनिमनाशी स्पर्धा करणाऱ्या, बाणाने वर्णिलेल्या अच्छोद सरोवराची आठवण होते."[१९] तर प्रा.रा.श्री.जोग पुढील प्रमाणे अभिप्राय देतात. "अर्वाचीन कवितेच्या जमान्यात जुन्या पध्दतीने काव्य लिहिणाऱ्या सर्व कवीत त्यांचे स्थान पहिले होते आणि निरपेक्षपणे प्रस्तुत काळातील समग्र काव्याचा विचार केला तरीही ते बरेच वरचे व स्वतंत्र आहे यात संदेह नाही."[२०]

## (८) माधवानुज १८७२-१९१६ -

माधवानुज उपाख्य काशिनाथ हरी मोडक हे कवी चंद्रशेखरांच्या समकालीन. ते व्यवसायाने डॉक्टर होते. माधवानुज हे केशवसुतांनी

उभारलेल्या झेंड्याखाली येऊन उभे राहिले व केशवसुतांच्या काव्यातील नाविन्याचे मर्म ओळखून त्यांनी अनुकरण केलेले दिसते. त्यांच्या कवितेचा बराच मोठा भाग दीनदलित आणि दुष्काळपीडितांच्या दैन्यावस्था यावर आहे त्यामुळे त्यांच्या काव्यावर कारुण्याची दाट छाया पडलेली दिसते. तत्कालीन राजकारणाचे त्याचप्रमाणे सामाजिक आणि आर्थिक समस्यांचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यात पडलेले आढळते. चंद्रशेखरांप्रमाणेच माधवानुज आपल्या कालातील युगधर्मापासून अलिप्त राहू शकले नाहीत.

सामाजिक प्रश्नांबरोबर आर्थिक प्रश्नांनाही माधवानुजांनी आपल्या काव्यातून वाचा फोडली आहे. परंतु त्यांची भूमिका बंडखोरीची नसून ती भूतदयावादी आहे. त्यांच्या "दुष्काळ", "दगड फोडताना", आणि "मुलांचा कोंडमारा" या कविता तर थेट अंतकरणाला जाऊन भिडणाऱ्या आहेत. दुष्काळी परिस्थितीत दिवसभर तुटपुंज्या मजुरीने खडी फोडण्याचे काम करणाऱ्या अशक्त, थकलेल्या आगतिक स्त्रीचे अतिशय करुणाजनक असे चित्र माधवानुजांनी रेखाटले आहे.

माधवानुजांची कविता विचाराने नवीन आहे. त्यांच्या काव्याचे विषयही नवीन आहेत. त्यातील काही विषयाचा संबंध मानवी जीवनाशी आहे. माधवानुजांची कवितेकडे पहाण्याची एक विशिष्ट दृष्टी होती. कविता लेखनात त्यांनी कवितादेवीला अतोनात महत्व दिले आहे.

माधवानुजांची कविता त्यांच्या समकालीन कवींच्या कवितेपेक्षा उठून दिसते इतका वेगळेपणा तिच्यात आहे. या वेगळेपणाविषयी भ.श्री.पंडित म्हणतात, "केशवसुतांच्या कवितेप्रमाणे ती गंभीर आहे पण गूढ नाही. टिळकांच्या कवितेप्रमाणे ती शांत आहे पण मंद नाही. विनायकांच्या कवितेप्रमाणे ती तेजस्वी आहे पण प्रखर नाही. चंद्रशेखरांच्या कवितेप्रमाणे ती सुबक आहे पण सुंदर नाही. गोविंदाग्रजांच्या कवितेप्रमाणे ती मोहक आहे पण मधाळ नाही आणि तांब्यांच्या कवितेप्रमाणे ती काठोकाठ भरून आहे पण ओसंडून वहात नाही. तिचे स्वतंत्र असे स्थान आहे."[२१]

तर माधवानुजांच्या काव्यगुणासंबंधी श्री.गं.त्र्यं.माडखोलकर म्हणतात - "केळीच्या कोवळ्या पानावर देवपूजेसाठी ठेवलेल्या कुंदाच्या ओंजळभर फुलांसारखी आहे ... रंग साधा पण शुभ्र, सुवासही बेताचा, शुचिता हेच त्यांचे गुणसर्वस्व." २२

आधुनिक काव्यात विषयाची वैविध्यता माधवानुजांनी घातलेली दिसते.

तांबे - जन्म १८७४ - मृत्यू १९४१ -

राजकवी तांबे हे "बीं"च्या समकालीन असे थोर कवी. आधुनिक मराठी कवितेच्या समीक्षकांनी तांब्यांचा उल्लेख अभिजात सौंदर्यवादी भावकवी असे केलेला आहे. कवी "बीं"ना इच्छा असूनही मॅट्रीक देखिल होता आले नाही. त्याचप्रमाणे तांबे यांनाही कौटुंबिक हिताकरिता प्रथम श्रेणीत मॅट्रीक होऊनही नोकरीच पत्करावी लागली व महाविद्यालयीन शिक्षणाचे महत्व "बीं"प्रमाणे बाजूला सारावे लागले.

तांबे आणि "बी" यांच्यात जीवनकांक्षा आणि युगधर्म या दोन्ही घटकात साम्य आढळते. महाराष्ट्राबाहेर राहून दोघेही राष्ट्रीय भावनेपासून अलिप्त राहू शकले नाहीत. राष्ट्रीय भावनेत समानता "बी" आणि तांबे यांच्यात आढळून येते.

कवी "बीं"च्या तुलनेने तांबे अधिक भावनोत्कट वाटतात. व्यक्तिगत आणि कौटुंबिक भावनांची अभिव्यक्ती त्यांच्या काव्यात अगदी उत्साहपूर्वक वाटते. तांब्यांनी आपल्या गीतातून सफल, सुखी वैवाहिक जीवनातील तृप्ततेची गीते उत्कटतेने गायिली आहेत. कवी "बीं"नी तशी गायलेली दिसत नाहीत. त्यांचे वैवाहिक जीवन तृप्त नव्हते असे नाही, सफल, सुखी नव्हते असेही नाही पण मुळातच, स्वभावत:च त्यांची कविता विचारप्रेरक व तात्वीक स्वरुपाची आहे. त्याचबरोबर त्यांची कविता आत्मलक्षी नसल्यामुळे व्यक्तिगत आणि कौटुंबिक गीते त्यांनी लिहलेली दिसत नाहीत.

तांबे काव्यात कल्पनेला महत्त्व देतात. कल्पना आणि वास्तवता यामधे ते भेद करतात. कला ही कलावंताची स्वतंत्र निर्मिती आहे असे सांगताना तांबे म्हणतात - "Poetry is not the imitation, the Photograph of nature, not because is ignores nature, but because it idealises it".[23] कवीच्या अंतकरणाला जाऊन भिडणारा कोणताही विषय काव्यरूप होऊ शकतो असे तांबे म्हणतात. त्यांच्या मतानुसार कविता म्हणजे वास्तवापेक्षा अनंतपटीने सुंदर असलेले निसर्गाचे चित्र म्हणजेच निसर्गाची प्रतिकृती म्हणजे काव्य असे त्यांना वाटत नाही, तर ते म्हणतात - "निसर्गातील कोणतीही वस्तू कवीच्या हृदयात प्रविष्ट होऊन तिने त्याला गदगदा हलवून टाकले आणि त्याच्या भावनेस आणि कल्पनेस वेगाने चालना दिली म्हणजे कवितेचा संभव होतो. तेथे वास्तव हृदयांतर्गत सत्वात सुस्नात होते आणि नंतर बाहेर येते."[२४]

एकंदर ते कविप्रतिभेला "कल्पनीय" नाव देतात.

आधुनिक मराठी कवितेला भारतीय संस्कृतीचा व काव्यपरंपरेचा आधार त्यांनी दिला.

## रविकिरण मंडळ -

१९२० च्या सुमारास आधुनिक कवीपंचकातील टिळक, गोविंदाग्रज, बालकवी व रेंदाळकर ही मंडळी दिवंगत झाल्याने मराठी कविता काही काळ खंडित झाली. त्यामुळे मराठी काव्यप्रांतात अंधार जाणवू लागला. १९२३ च्या सुमारास अभ्यासाच्या निमित्ताने एकत्र जमलेली तरूण कवीमंडळी काव्यचर्चा करू लागली आणि त्या चर्चेतूनच रविकिरण मंडळ तयार झाले. जणू काही या मंडळाने अंधारू लागलेल्या मराठी काव्याला उजेडात आणले. मंडळाच्या सभासदापैकी काहींनी मंडळ सोडले, काही दिवंगत झाले तर काहींना मंडळ न सोडता काव्य करायचे सोडून दिले. शेवटी माधव जूलियन, गिरीश व यशवंत या तिघांनी शारदेची भरपूर उपासना केली.

केशवसुतांनी जी परंपरा सुरु केली होती तीच रविकिरण मंडळाने अधिक जोराने पुढे चालविली. गज्जल, सुनीत, जानपदगीत, शिशुगीत, राष्ट्रगीत, विडंबनकाव्य इत्यादी काव्यप्रकार मराठी साहित्यात रुढ केले. काव्यात नव्या त-हा सुरु केल्या. रविकिरण मंडळाने मराठी काव्यसंपदेत जी मोलाची भर घातली ती बिनतोड आहे. या मंडळाने आधीच्या कवितेस व्यवस्थित रुप देऊन तीमधे विविधता आणून ती आकर्षक केली व पूर्वीपेक्षा अधिक व्यापक बनविली. तिचे व्यवस्थापन आणि विस्तार करणे हेच या मंडळाने मुख्य ध्येय ठेवले.

रविकिरण मंडळासाठी ज्या तिघांनी स्वतःला वाहून घेतले त्यांचा आपण थोडक्यात परिचय करुन घेऊ.

(१) माधव ज्यूलियन - १८९४-१९३९ -

रविकिरण मंडळातले हे प्रमुख कवी माधवराव पटवर्धन हे महाराष्ट्राला केवळ कवी म्हणून परिचित नाहीत तर "फार्शी- मराठी कोशाचे कर्ते", विद्वान कोशकार, मराठी भाषेच्या शुध्दीकरणाच्या आंदोलनातले एक झुंजार वृत्तीचे आणि धडाडीचे पक्षकार, काव्यसंमेलनाचे आणि मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (१९३६ जळगाव) आणि एक प्रथितयश काव्यचिकित्साकार अशा विविध नात्यांनी ते परिचित आहेत.

त्याचबरोबर तांब्यांप्रमाणे "प्रणय पंढरीचे वारकरी" म्हणूनही रसिकांना परिचित आहेत. माधवरावांनी प्रेमविषयाला मराठी काव्यात प्रतिष्ठा मिळवून दिली. केशवसुत, तांबे, "बी" या कवींच्या तुलनेत माधवरावांची राष्ट्रीय कवितांची संख्या अधिक आहे. त्यांची कवीता विपुल आणि विविध आहे.

खंडकाव्ये, स्फुट काव्यसंग्रह, "उमर खय्यामच्या रुबया", अनुवादित कवीता वगैरे काव्यसंपदा त्यांच्या नावावर दिसते.

गज्जल हा काव्यप्रकार मराठीत भक्कम पायावर त्यांनीच उभा केला.

त्यांनी आपली गज्जलांजली प्रसिध्द करून भावोत्कृष्ट उत्तान प्रेमगीताचा नवीनच प्रकार मराठी रसिकांना अर्पण केला. आधुनिक मराठी काव्यात प्रा.माधवराव पटवर्धनाचे विशिष्ट स्थान आहे. वि.पा.दांडेकर त्यांच्या विशिष्ट कामगिरीबद्दल बोलताना म्हणतात - "त्यांच्या इतका संशोधक बुध्दीचा, व्यासंगी वृत्तीचा व ठासीव भावशैलीचा दुसरा कवी अलिकडच्या काळात झालाच नाही. आपले काव्य पुन: पुन: घासून स्वच्छ करून, पैलू पाडून एखादा तेजस्वी हि-याप्रमाणे रसिकांच्या हाती देण्याचा माधवरावांना मोठा उल्हास सामाजिक सुधारणेसाठी त्यांच्या चित्ताची जी चडफड होई, ती त्यांच्या काव्यातून तप्तरसाप्रमाणे वाहत आहे. उलट तरूण अंतकरणातील प्रेमभावनेची शीतलरम्य कारंजीही त्यांच्या काव्यात सर्वत्र उडत आहेत. मराठी काव्याला जाति-वृत्तांची भक्कम व व्यवस्थित तटबंदी उभारण्याचे श्रेय खास माधवरावांचेच."[२५] अशी मोलाची कामगिरी माधवरावांनी रविकिरण मंडळात केली आहे.

रविकिरण मंडळाला मोलाचा हातभार लावणारे दुसरे कवी म्हणजे -

(२) गिरीश - १८९३-१९७३ -

आपल्या काव्य गायनाने काव्याची गोडी लोकांच्या ठिकाणी निर्माण करणा-या कविमधे गिरिशांची गणना करावी लागेल. आपल्या गोड गळ्याने गाऊन दाखविलेल्या त्यांच्या "मन गेले तुझ्यावर जडून रमा" व "भलरी" या कविता अबालवृध्दांच्या तोंडात एकेकाळी खेळत होत्या.

गिरीश हे संवेदनाशील अंतकरणाचे भावकवी होते. तरी ते स्वत:च्या सुखदु:खांना सदोदित कुरवाळणारे आत्मनिष्ठ कवी मात्र नाहीत. त्यांचा पिंड सत्वशील, सुसंस्कृत, कर्तव्यदक्ष व सदाचारसंपन्न शिक्षकांचा असल्यामुळे त्यांचा ओढा आदर्शाकडे अधिक आहे. मराठी काव्याच्या क्षेत्रात त्यांचे नाव "अभागी कमल" व "आंबराई" या काव्याचे लेखक म्हणून आहे. "अभागी कमल" मधे विधवेची करूण कहाणी सांगितली आहे. यातील

करुणारसाने वाचकांचे डोळे ओलावल्यावाचून रहात नाहीत.

स्फुट आणि दीर्घ अशा दोन्ही प्रकारची विपुल काव्यरचना त्यांनी केलेली आहे. काही खंडकाव्येही गाजलेली आहेत.

समाजनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा आणि ईश्वरनिष्ठा या त्रिविध निष्ठांनी गिरिशांचे भावजीवन संपन्न आहे.

अशा प्रकारचे कार्य गिरिशांनी रविकिरण मंडळात केले आहे.

(३) यशवंत - १८९९-१९८५ -

रविकिरण मंडळातील हे अधिक लोकप्रिय कवी आहेत. इ.स. १९५० मधे मुंबई येथील ३३ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांनी खंडकाव्ये लिहली आहेत. ग्रामदेवतेच्या आणि मातृभूमीच्या ऋणातून मुक्त व्हावे या प्रेरणेने "छत्रपती शिवराय" हे महाकाव्य त्यांनी लिहले आहे.

सामान्य आशय आणि स्वयकेंद्रित वृत्ती ही रविकिरण मंडळाची वैशिष्टये, यशवंतांच्या काव्यात प्रकर्षाने दिसून येतात. यशवंताची प्रतिभा आत्मपर आहे. पण त्यांच्या सर्वच कवितासंग्रहातून प्रतिकूल परिस्थितीच्या, दुर्दैवाच्या दारुणतेचा व जगाच्या विपरीतपणाचा कंटाळवाणा पुनरुच्चार आहे. माधव मनोहर तर त्यांना "दु:खाचे शाहीर" म्हणून संबोधतात.

रविकिरण मंडळाच्या या तीन कवींनी नवीन कवींची प्रतिभा दीर्घ व महाकाव्य लेखनास समर्थ नसते हा त्यांच्यावर येणारा आक्षेप यशस्वीरीत्या खोडून टाकला आहे. आणि इतरही कवींना असे दीर्घ काव्य लिहण्यास प्रवृत्त केले आहे. अर्वाचीन मराठी काव्याच्या इतिहासात रविकिरण मंडळाची कामगिरी मोठी मोलाची आहे यात शंका नाही.

कोणी "गज्जलांचे" आदर्श स्वरुप मांडले, काहींनी "सुनीता"चे काव्यदृष्ट्या सामर्थ्य आणि कारागिरीचे सौंदर्य प्रत्ययास आणले, कोणी प्रेमगीतामधून काव्यात जिव्हाळा ओतला, काहींनी "सामाजिक खंडकाव्ये" लोकप्रिय केली, कोणी "जानपदगीते" लिहिली, जुन्या जातिरचनांचा उध्दार

केला, "काव्यविषयक" चर्चाही केली आधी झालेल्या क्रांतीच्या व्यवस्थापनाचे व विस्ताराचे कार्य त्यांनी चांगल्या प्रकारे बजावले. त्यामुळे रविकिरण मंडळाची थोरवी केंव्हाच नाकारता येत नाही. या मंडळाच्या काव्यकर्तृत्वाबद्दल रा.श्री.जोग म्हणतात - "मंडळाने विचारक्रांती घडवून आणली नसली तरी केशवसुत परंपरा पुढे चालवली."[२६] तर कुसुमावती देशपांडे म्हणतात - "कवितेला लोकाभिमुख करणे व लोकजीवनातल्या अनुभवांना वाचा फोडणे हे कार्य मंडळाने केले."[२७]

## २.४ सा रां श -

या काळातील कवितांचे सूक्ष्म अवलोकन केले तर एक गोष्ट आपल्या पटकन लक्षात येते की, तिची जडणघडण आगरकरी वळणावर म्हणजेच प्रगतिपर विचारसरणीच्या वळणावर गेलेली आहे. केशवसुत हे या काळातील मुख्य कवी. केशवसुतांच्या "तुतारी" च्या धर्तीवर रे. टिळक, गोविंदाग्रज बालकवी, "बी", यासारख्या प्रतिभावंत कवींनी कविता लिहल्या. अगदी अलिकडच्या काळात आधुनिक मराठी कवीत लोकप्रियतेचा कळस गाठणाऱ्या गोविंदाग्रजांना स्वत:ला "केशवसुतांचा सच्चा चेला" म्हणवून घेण्यात अभिमान वाटला. केशवसुतांनी वृत्त रचनेचे जे नवे प्रयोग केले त्यांचे अनुकरण या कालखंडातल्या बऱ्याच कवींनी कळतनकळत अनुकरण केले.

सामाजिक अन्यायाबद्दलची आणि सामाजिक समतेबद्दलची आत्यंतिक चीड हा आधुनिक कवितेचा विशेष अनेक कवींच्या काव्यातून प्रकट झाला. त्याचबरोबर या कालखंडातल्या कवितेतून राष्ट्रवादाच्या मानाने मानवतावादाचा आणि समाजवादाचा ध्वनी जास्त प्रमाणात ऐकू येतो. त्यातही हा ध्वनी स्त्रीजीवनविषयक समस्येवरच घुटमळत राहिलेला आहे. दुष्काळपीडित, मजूर, अंत्यज यांच्या दु:खाची दखल घेतली गेली पण अत्यंत अल्प प्रमाणात.

या काळात सामाजिक कवींनी अत्यंत क्रांतिकारक स्वरूपाची कामगिरी केली. त्यांनी सर्वसामान्य व्यक्तीच्या सुखदु:खांना काव्यविषयात स्थान दिले.

काव्यविषयात जणू काही लोकशाही प्रस्थापित केली. आधुनिक कवींनी जुन्या रूढी, परंपरेची बंधने झुगारून दिली. पौराणिक व्यक्तींच्या भोवती न घटमळता सर्वसामान्य माणसाकडे वळली.

आधुनिक कवितेने व्यक्तिगत अनुभूतीला स्थान दिल्यामुळे तिच्या अंतरंगात गोडवा निर्माण झाला. प्रेमभावनेचे आविष्करण या कवींनी केले. पण प्रेमाच्या सफलतेपेक्षा विफलतेचीच गीते अधिक प्रमाणात गायीली.

आधुनिक कवींनी कवीचे महत्त्व गायिलेले दिसते. कवी हा भविष्यकाळाचा द्रष्टा आणि स्रष्टा असतो अशा कल्पना अतिशयोक्तीने आपल्या कवितातून मांडलेल्या आढळतात. त्याचबरोबर निसर्गालाही स्थान त्यांनी आपल्या काव्यात दिले. शिशुगितांनाही स्थान या कवितेने दिले.

प्रेमगीते, निसर्गगीते, शिशुगीते, प्रगतिवादी गीते, गूढगुंजनात्मक गीते ही आधुनिक मराठी कवितेचे एक वैशिष्टय ठरेल.

अंतरंगात क्रांती केली त्याचप्रमाणे बाह्यंगातही क्रांती केली. पूर्वीची अक्षरगण वृत्ते वापरण्याची जी प्रवृत्ती होती ती या कालखंडात पुष्कळच कमी झाली. त्याऐवजी मात्रावृत्तांचा प्रचार झालेला दिसतो.

"सुनित" हा काव्य प्रकारही याच कालखंडात प्रतिष्ठा पावला.

अशा प्रकारे आधुनिक कवींच्या काव्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

१) जोशी छाया
डॉ.संत जान्हवी
अर्वाचीन साहित्यसमालोचन
(१८०० ते १९५०)
प्रकाशक - शां.द.सबनीस, कोल्हापूर
तृतीय आवृत्ती जानेवारी १९९०
पृष्ठ क्र.७

२) गिडे वा.पु.
बालकवींची कविता : एक रसास्वाद
प्रकाशक - विनायक जवळकर, बेळगाव
प्रथम आवृत्ती १९७८
पृष्ठ क्र. ८

३) दांडेकर वि.पा.
मराठी साहित्याची रूपरेषा
प्रकाशक - वि.पा.दांडेकर, बडोदे
द्वितीयावृत्ती - १९५२
पृष्ठ क्र. २५४-२५५

४) डॉ.कुलकर्णी वि.म.
केशवसुत - स्मृति-ग्रंथ
प्रकाशक - प.चि.दामले, राहूरी
पृष्ठ क्र. १०६

५) डॉ. गिडे वा.पु.
बालकवींची कविता : एक रसास्वाद
प्रकाशक - विनायक जवळकर, बेळगांव
प्रथम आवृत्ती १९७८ पृष्ठ क्र.९-१०

६) प्रा.जोग रा.श्री.
प्रदक्षिणा खंड पहिला
प्रकाशक - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
सातवी आवृत्ती - १९९३
पृष्ठ क्र. १२

७) डॉ.वाळिंबे रा.शं. साहित्यातील संप्रदाय
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
तिसरी आवृत्ती १९७४
पृष्ठ क्र. १८८

८) खानोलकर गं. दे. अर्वाचीन मराठी वाङ्‌मयसेवक
प्रथम खंड
प्रकाशक - एम.एन.कुलकर्णी, मुंबई
पृष्ठ क्र. १६९

९) खानोलकर गं.दे. अर्वाचीन मराठी वाङ्‌मयसेवक
प्रथम खंड
तत्रैव
पृष्ठ क्र. १६९

१०) शिखरे दा. न. मराठीचा परिमल
खंड दुसरा
प्रकाशक - भ. शं कुलकर्णी, पुणे
द्वितीयावृत्ती - १९७२
आधुनिक कवी - पृष्ठ क्र. १५

११) कुलकर्णी वि.अ. मराठी काव्यसमीक्षा
प्रकाशक - गो.वा.कुलकर्णी, कोल्हापूर
द्वितीयावृत्ती - १९४५
पृष्ठ क्र. १२४

१२) डॉ.नाईकवाडे ज.धु. राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता
प्रकाशक - भा.ल.कुलकर्णी, नागपूर
प्रथमावृत्ती - १९८९ पृष्ठ क्र. २१२

१३) कुलकर्णी वि.अ. — मराठी काव्यसमीक्षा
प्रकाशक - गो.वा.कुलकर्णी, कोल्हापूर
द्वितीयावृत्ती १९४५, पृष्ठ क्र. १२७

१४) डॉ.वाळिंबे रा.शं. — साहित्यातील संप्रदाय
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
तीसरी आवृत्ती १९७४ पृष्ठ क्र. २००-२०१

१५) कुलकर्णी वि.अ. — मराठी काव्य समीक्षा
प्रकाशक-गो.वा.कुलकर्णी, कोल्हापूर
द्वितीयावृत्ती १९४५ पृष्ठ क्र. १३०

१६) डॉ.नाईकवाडे ज.धु. — राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता
प्रकाशक- भा.ल.कुलकर्णी, नागपूर
प्रथमावृत्ती १९८९, पृष्ठ क्र. २३६

१७) प्रा.पंडित भ.श्री. — आधुनिक कवितेचे प्रणेते
भाग दुसरे, प्रकाशक- दि.म.धुमाळ, नागपूर
प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. ३०६

१८) देशपांडे अ.ना. — आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
भाग पहिला,
प्रकाशक - स.कृ.पाध्ये, पुणे
द्वितीयावृत्ती - १९६७
पृष्ठ क्र. ३५१

१९) कुलकर्णी वि.अ. — मराठी काव्यसमीक्षा
प्रकाशक - गो.वा.कुलकर्णी, कोल्हापूर
द्वितीयावृत्ती १९४५, पृष्ठ क्र.१२८

२०) डॉ.नाईकवाडे ज.धु. — राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता
प्रकाशक- भा.ल.कुलकर्णी, नागपूर
प्रथमावृत्ती १९८९, पृष्ठ क्र.२१७

२१) प्रा.पंडित भ.श्री. — आधुनिक कवितेचे प्रणेते भाग पहिला
प्रकाशक - दि.म.धुमाळ, नागपूर
प्रथमावृत्ती १९७१, पृष्ठ क्र.२०३

२२) डॉ.नाईकवाडे ज.धु. — राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता
प्रकाशक- भा.ल.कुलकर्णी, नागपूर
प्रथमावृत्ती १९८९, पृष्ठ क्र.२२५

२३) डॉ.नाईकवाडे ज.धु. — तत्रैव
पृष्ठ क्र.२५९

२४) प्रा.पंडित भ.श्री. — आधुनिक कवितेचे प्रणेते भाग दुसरा
प्रकाशक- दि.म.धुमाळ, नागपूर
प्रथमावृत्ती १९७१, पृष्ठ क्र.३७२

| | | |
|---|---|---|
| २५) | शिखरे दा.न. | मराठीचा परिमल<br>खंड दुसरा<br>प्रकाशक - भ.शां.कुलकर्णी, पुणे<br>द्वितीयावृत्ती १९७२<br>आधुनिक कवी पृष्ठ क्र. ५४ |
| २६) | जोशी छाया<br>डॉ.संत जान्हवी | अर्वाचीन साहित्य समालोचन<br>(१८०० ते १९५०)<br>प्रकाशक शं.द.सबनीस, कोल्हापूर<br>तृतीय आवृत्ती, जानेवारी ९०<br>पृष्ठ क्र.८२ |
| २७) | जोशी छाया<br>डॉ.संत जान्हवी | तत्रैव<br>पृष्ठ क्र.८२ |